दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २१५ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शनिवार, दि.१ नोव्हेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## आपल्यावर पोलिसांची पाळत; काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा दावा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आपल्यावर पोलीस पाळत ठेवून आहेत. मुंबईतील नाना चौकातील सर्वोदय आश्रमात आपला मुक्काम असतो. त्या आश्रमात पोलीस सातत्याने पाळत ठेवत आहेत. साध्या वेशातील एका पोलिसाने थेट शयनखोलीमध्ये घुसून टेहळणी आणि चौकशी केली. हे आतापर्यंत तिसऱ्यांदा घडले आहे, असा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शुक्रवारी केला. अकोला आणि हिंगोलीतील शिवसेना शिंदे गटाच्या महत्वाच्या स्थानिक नेत्यांनी आज सपकाळ यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यावेळी प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधींशी बोलताना सपकाळ यांनी पोलीस आपल्या हालचालींवर नजर ठेवून असल्याची माहिती दिली. सकाळी एक पोलीस थेट शयनखोलीत घुसून टेहळणी करत होता. तुम्ही पत्रकार परिषद घेणार आहात का? पत्रकार आले आहेत का?, यासह अनेक प्रश्न त्याने विचारले. तुम्ही शयनखोलीत प्रवेश का केला, कोणाचे आदेश आहेत, असे विचारले असता, वरिष्ठांचे आदेश आहेत असे म्हणत वरिष्ठांना फोनवर बोला असे सांगितले. अशा पद्धतीने विरोधी पक्षांच्या नेत्यांवर पाळत ठेवली जात आहे.

### पनवेल महानगरपालिका दक्षता जनजागृती सप्ताह

# अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सर्व नियंमाचे पालन करत निस्पृह काम करावे: आयुक्त मंगेश चितळे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

केंद्रीय दक्षता आयोग, तसेच राज्य शासनाच्या सूचनेनुसार दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला जात आहे. या अंतर्गत आज दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्राचे पोलिस अधिक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना पोलिस अधिक्षक शिवराज पाटील म्हणाले, कोणत्याही प्रलोभनांना न भुलून जाता शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समाधानाने, प्रामाणिकपणे व सचोटीने काम करावे. तसेच अधिकारी, कर्मचारी व नागरिकांमध्ये भ्रष्टाचाराबाबत जनजागृतीची आवश्यकता स्पष्ट करताना त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याची माहिती सांगितली.

यावेळी आपल्या प्रास्ताविकामध्ये आयुक्त मंगेश चितळे यांनी शासकीय सेवेत काम करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सर्व नियंमाचे पालन करत काम सचोटीने,निस्पृह काम करायला हवे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले तसेच उपस्थितांचे आभार परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी मानले.




यावेळी मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त नानासाहेब कामठे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, लेखाधिकारी संग्राम ऱ्होरकाटे तसेच लाचलुचपत प्रतिबंध विभागचे अप्पर पोलिस निरीक्षक भागवत सोनावणे, पोलिस उप अधिक्षक धर्मा सोनके उपस्थित होते. या कार्यक्रमास महापालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शनिवारी पनवेलमध्ये 'संगीत मॅरेथॉन'

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शनिवार दिनांक ०१ नोव्हेंबर रोजी 'उत्कर्ष संगीत मैफिल' तर्फे मराठी आणि हिंदी सुमधूर ७५ गाण्यांचा बहारदार कार्यक्रम अर्थात संगीत मॅरेथॉन पनवेलमध्ये होणार आहे.

गायक गोपाळ पाटील यांच्या संकल्पनेतून हा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे हा संगीत कार्यक्रम सकाळी ११.३० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सलग होणार आहे. या कार्यक्रमात गायक गोपाळ पाटील स्वतः ७५ गाण्यांची मनमोहक सादरीकरणे करणार असून, या कार्यक्रमात उरण, पनवेल आणि नवी मुंबई येथील ७५ गायकांचा गायक म्हणून सहभाग लाभणार आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर हे राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य देणारे लोकनेते म्हणून ओळखले जातात. गेली पाच दशकाहून अधिक काळ त्यांनी सामाजिक कार्याची अखंड परंपरा जपली आहे आणि हे कार्य त्यांच्याकडून अखंडपणे सुरूच आहे.

यंदा त्यांनी आपल्या वयाच्या ७५ व्या अर्थात अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले. त्या निमित्ताने कीर्तन महोत्सव, भजन स्पर्धा, रक्तदान शिबीर, शिधा वाटप, विविध क्रीडा



स्पर्धा, नाट्य महोत्सव, वक्तृत्व स्पर्धा अशी विविध समाजोपयोगी उपक्रमे संपन्न झाली असून पूर्ण वर्षभर अनेक सामाजिक कार्यक्रमे होणार आहेत. त्याच अनुषंगाने उत्कर्ष संगीत मैफिल प्रस्तुत ७५ गाण्यांची संगीत मॅरेथॉन होणार आहे. या सामाजिक उपक्रमांच्या मालिकेतच 'संगीत मॅरेथॉन' हा सांस्कृतिक सोहळा पनवेलकरांसाठी एक सुरेल मेजवानी ठरणार आहे.

# वाढत्या घनकचरा समस्येच्या पार्श्वभूमीवर आवश्यक कार्यवाही करा : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील वाढत्या घनकचरा समस्येच्या पार्श्वभूमीवर आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोकडे निवेदनाद्वारे केली आहे. पनवेल परिसरातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये कचरा व्यवस्थापनाची समस्या तीव्र होऊ नये या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोच्या सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांना दिलेल्या निवेदनात तत्काळ उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.

निवेदनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हंटले आहे कि, पनवेल तालुक्यातील एकूण ७१ ग्रामपंचायतीपैकी १० पेक्षा जास्त ग्रामपंचायती या सिडको अधिसूचित क्षेत्रात व ४० पेक्षा जास्त ग्रामपंचायती नैना अधिसूचित क्षेत्रात आहेत. नियोजन प्राधिकरणामार्फत विविध बांधकामांना परवानगी देते वेळेस विकास शुल्काची आकारणी करण्यात येते. तसेच सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनची खात्री केल्यानंतरच भोगवटा प्रमाणपत्र दिले जाते. सिडको व नैना या नियोजन प्राधिकारणाकडील विविध विकास कामांमूळे अधिसूचित क्षेत्रातील निवासी, औद्योगिक व वाणिज्यक आस्थापनांची मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. अधिसुचित क्षेत्रातील वाढत्या विकास कामांमुळे पर्यायाने नागरी लोकसंख्येमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. तसेच, दैनंदिन रोजगारासाठी स्थलांतरित होणारी संख्या ही जास्त आहे. त्यामुळे अधिसुचित क्षेत्रातील निवासी, वाणिज्यक, व औदयागिक आस्थापनांकडून होणारी कचरा निर्मिती ही प्रचंड आहे. सबब, अधिसुचित क्षेत्रातील ग्रामीण हद्दीमध्ये कच-याचे



व्यवस्थापन करणे ही अत्यंत गरजेची बाब झाली आहे. सदयस्थितीत ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत कचरा व्यवस्थापन हातळले जात आहे. परंतु, ग्रामपंचायती मार्फत होणारे कचरा व्यवस्थापन हे पुरेशा आर्थिक तरतुदी व संसाधनाअभावी आदर्श कचरा व्यवस्थापन होत नसल्याचे यापुर्वी वारंवार निदर्शनास आलेले आहे. सध्या ग्रामपंचायती मार्फत ग्रामीण हद्दीतील कच-याचे संकलन केले जात आहे.

तथापि, शास्त्रीयदृष्ट्या कच-यावर प्रक्रिया केली जात नाही. तसेच कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे व चालवणे याकरिता ग्रामपंचायतीकडे आवश्यक निधी, मनुष्यबळ साधन सामुग्री व तांत्रिक सुविधा यांची कमतरता आहे. तरी, पनवेल ग्रामीण हद्दीतील सिडको- नैना अधिसुचित क्षेत्रात निर्माण होणारा कचरा, सिडकोकडील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प मार्फत प्रक्रिया करणेच आवश्यक आहे. परंतु, सदर कचरा व्यवस्थापना करिता लागणारा प्रक्रिया खर्च देण्यास ग्रामपंचायती सक्षम नाहीत, तसेच, कचरा निर्मिती ते सिडको कडील सदयास्थितीतील कार्यरत कचरा प्रक्रिया केंद्र या करिताही येणारा वाहतुक खर्च मोठ्या प्रमाणात येणार आहे व याकरिता ग्रामपंचायतीकडे पुरेशी आर्थिक तरतूद नाही. सबब ग्रामपंचायती मार्फत जमा होणा-या कच-याचे आदर्श व्यवस्थापन करण्याकरिता, सिडको मार्फत ग्रामपंचायती सोबत उचित करार केल्यास तसेच येणारा प्रक्रिया खर्च माफ केल्यास ग्रामपंचायत हद्दीत घनकचरा व्यवस्थापन करणे शक्य होईल. म्हणून पनवेल ग्रामीण हद्दीतील सिडको नैना अधिसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या प्रस्तावांचा सकारात्मक विचार करुन त्यांचे कचरा व्यवस्थापन सिडको यंत्रणेमार्फत करुन देण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे.

## संक्षिप्त...

### महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष चौकशी पथक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणाचा तपास आता विशेष तपास पथकामार्फत करण्यात येणार आहे. या प्रकरणाचे गांभीर्य आणि संवेदनशीलता लक्षात घेऊन राज्याचे पोलिस महासंचालक यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने एसआयटी स्थापन करण्याचे निर्देश दिले. हा संपूर्ण तपास महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालील विशेष तपास पथकाकडून केला जाईल, जेणेकरून प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी व्हावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आले आहेत.

फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरने केलेल्या आत्महत्येनंतर खळबळ उडाली. आत्महत्येपूर्वी तिने आपल्यावर विरष्ठांचा आणि पोलिसांचा दबाव असल्याचे नमूद करण्यात आली होती. विरोधकांकडून भाजपचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या स्वीय सहायकांसह पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. आत्महत्येपूर्वी चिठ्ठीत महिला डॉक्टरने पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदने याच्यावर चार वेळा बलात्कार केल्याचा गंभीर आरोप केला आहे.

## संजय राऊतांच्या प्रकृतीत अचानक गंभीर बिघाड



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांची प्रकृती अचानक बिघडल्याची माहिती समोर आली आहे. राऊत यांनी स्वत:च आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरून याबाबत सांगितलं असून त्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे काही महिने सार्वजनिक जीवनातून दूर राहावं लागणार आहे. वैद्यकीय सल्ल्यानुसार त्यांना गर्दीत मिसळण्यास आणि बाहेर जाण्यास मनाई करण्यात आली आहे. मी लवकरच बरा होऊन नवीन वर्षात सर्वांना भेटेन, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

संजय राऊत यांनी आपल्या मित्रपरिवार आणि कार्यकर्त्यांना उद्देशून एक भावनिक आवाहन केलं आहे. ते म्हणाले, आपण सगळ्यांनी माझ्यावर कायम विश्वास ठेवला आणि प्रेम केले, पण सध्या अचानक माझ्या प्रकृतीत काही गंभीर स्वरुपाचे बिघाड झाल्याचं समोर आलं आहे. याबाबत उपचार सुरू असून मी यातून लवकरच बाहेर पडेन.

दरम्यान, संजय राऊत यांच्या प्रकृतीतील बिघाडामुळे डॉक्टरांनी त्यांना विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे, वैद्यकीय सल्ल्यानुसार मला बाहेर जाणं आणि गर्दीत मिसळणं यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यास नाईलाज आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं. राऊत यांनी आपल्या समर्थकांना धीर देत म्हटलं आहे की, मला खात्री आहे मी ठणठणीत बरा होऊन साधारण नवीन वर्षात आपल्या भेटीस येईन. आपले प्रेम आणि आशीवीद असेच राहू द्या. 'सामना दैनिकाचे कार्यकारी संपादक असणारे संजय राऊत हे अग्रलेखांच्या माध्यमातून आपल्या पक्षाचा आवाज बुलंद करत असतात.

खुश खबर ! खुश खबर ! खुश खबर !

पनवेल महानगरपालिका
पाणी कर संकलन विभाग

शास्ती अभय योजना

पाणी कर धारकांसाठी आनंदाची बातमी!
शास्ती अभय योजना लागू करण्यात आली आहे.

| अ. क्रं | पाणी करावरील शास्ती अभय योजनेचा कालावधी | शास्ती माफीची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | ०१/११/२०२५ ते ३०/११/२०२५ | १००% |
| २ | ०१/१२/२०२५ ते १५/१२/२०२५ | ७५% |

सदर योजनेचा लाभ खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे.
शास्ती अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी थकबाकीदाराने पाणी कराचा संपूर्ण भरणा एकाचवेळी करणे आवश्यक राहील. सदर योजना हि वरील कालावधी करिताच मर्यादित राहील .

मालमत्ता कर भरणा करण्याकरिता
Karmitra PMC App &
Panvel Connect App डाउनलोड करा.

PANVEL CONNECT

QR Code
स्कॅन करा आणि
पाणी कर भरा

# राजकारणाची ‘कडू’ गोळी

अतिवृष्टीचा तडाखा, उद्ध्वस्त शेती, कोसळलेले बाजारभाव आणि सरकारी उदासीनता अशा दुष्टचक्रात सापडलेल्या शेतकऱ्याला मदतीची आत्यंतिक गरज आहे. सरकारी व खासगी कर्ज फेडणे त्याच्यासाठी जिकिरीचे आहे. या विळख्यातून त्याची सुटका व्हायलाच हवी. कर्जमाफीचे आश्वासन देऊनच सत्तेवर आलेल्या राज्यातील महायुती सरकारकडून खूप अपेक्षा आहेत. म्हणूनच सरकारला त्या आश्वासनाची सतत आठवण करून दिली जात आहे. या पार्श्वभूमीवर, प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते, माजी राज्यमंत्री आणि महत्त्वाचे म्हणजे लढवय्ये नेते ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी महाएल्गार पुकारला. विदर्भाच्या सगळ्या जिल्ह्यांमधून आणि राज्याच्या काही भागातून आलेल्या हजारो शेतकऱ्यांनी नागपूर-हैदराबाद महामार्ग रोखला. राज्याच्या उपराजधानीचे जनजीवन तीन दिवस विस्कळीत झाले. स्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता असतानाच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्वतःहून नागरिकांच्या अडचणींची दखल घेतली आणि राष्ट्रीय महामार्ग मोकळा करण्याचे आदेश आंदोलकांना दिले. उच्च न्यायालयाच्या या सक्रियतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शेतकऱ्यांच्या दुरवस्थेवरही अशी सक्रियता दाखविण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. हा आक्षेप व अपेक्षा साहजिक असली तरी न्यायालयाचा आदेश बेकायदेशीर नाही आणि अशी सुमोटो दखल घेण्याचा अधिकार न्यायालयाला आहेच. आता कर्जमाफीच्या मागणीबाबत बच्चू कडू, राजू शेट्टी, महादेव जानकर, अजित नवले वगैरे शेतकरी नेत्यांसोबत सरकार चर्चा करीत आहे. यापैकी बहुतेक नेते कधी ना कधी महायुतीत राहिले, हे विशेष. असो. यातून शेतकऱ्यांना काहीतरी दिलासा मिळेल, अशी आशा आहे. बच्चू कडू यांचे हे काही पहिले आंदोलन नाही. गेली पंचवीस-तीस वर्षे ते शेतकरी, कष्टकरी, विशेषतः दिव्यांग अशा समाजातल्या दुबळ्या वर्गासाठी सतत आक्रमक आंदोलने करीत आले आहेत. या गरजू वर्गासाठी रस्त्यावर उतरून ते सत्तेला प्रश्न विचारत आले आणि दरवेळी सत्ताधाऱ्यांना झुकवित गेले. किंबहुना त्यांनी त्यांचे विधिमंडळातील सदस्यत्वही आंदोलनांसारखेच वापरले. सर्वसामान्यांशी नाळ जुळलेला चळवळ्या नेता अशीच त्यांची प्रतिमा राहिली. अर्थात, या प्रतिमेवर आता काही चरे पडले आहेत. त्यांच्या आधीच्या व आताच्या आंदोलनात मूलभूत फरक हा की, कधीकाळचे आंदोलक बच्चू कडू आता ठळकपणे राजकारणी बनले आहेत. बच्चू कडू यांच्या अमरावती जिल्ह्यातील अचलपूर-चांदूरबाजारमधील आमदारकीच्या चारपैकी तीन टर्म राज्यात काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार होते. याच काळात आंदोलक म्हणून त्यांची प्रतिमा बहरली. महाविकास आघाडी सरकारमध्ये राज्यमंत्रिपद आणि नंतर शिवसेना फुटीवेळी आमदार घेऊन गुवाहाटीला पोहोचलेल्या एकनाथ शिंदे यांना साथ, त्या बंडात सहभागाने बच्चू कडू यांच्या राजकारणाला निर्णायक वळण दिले. त्यांचे मंत्रिपद गेले. शेजारच्या मेळघाटातील प्रहार पक्षाचा आमदारही सोबत राहिला नाही. विधानसभेला भाजप उमेदवाराकडून पराभव झाला. महत्त्वाचे म्हणजे, असा एखादा आंदोलक नेता असा राजकारणी बनतो तेव्हा सर्वाधिक नुकसान त्या आंदोलनाचे, चळवळीचे होते... आणि अशा नेत्यांना हाताळणे सत्ताधाऱ्यांना अगदीच सोपे असते. कधीकाळी आर. आर. पाटील यांच्यासारखे नेते बच्चू कडू यांच्या नाकदुऱ्या काढण्यासाठी पाण्याच्या टाकीवर चढत होते आणि आता स्वतःचे शहर वेठीस धरले जात असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे त्यांना भेटायलाही गेले नाहीत. पंकज भोयर व आशिष जयस्वाल या दोन राज्यमंत्र्यांवर कडू यांची बोळवण झाली, हा फरक सहज जाणवणारा आहे. राजकारणी आंदोलक हाताळण्याचे हे सत्ताधाऱ्यांचे कौशल्य आजचे नाही. शेतकरी आंदोलनांचा मोठा इतिहास असलेल्या विदर्भाला शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेची याच कारणाने झालेली वाताहत अजूनही आठवते. बच्चू कडू यांचे यश हे की, पुलाखालून इतके पाणी वाहून गेल्यानंतरही मोठ्या संख्येने शेतकरी अजूनही त्यांच्या पाठीशी आहेत. परंतु, सरकारला झुकविण्यासाठी तेवढे पुरेसे नाही. आंदोलन गैरराजकीय असेल तर मनोबलाचा रथ जमिनीपासून चार बोटे उंचावर चालत असतो. राजकीय पुनर्वसनाची महत्त्वाकांक्षा, हडेलहप्पी आणि डावपेचांचा स्पर्श आंदोलनाला होतो त्याक्षणी हा रथ जमिनीला टेकतो. शेतकरी महाएल्गाराची गरज खरी आणि हेतू प्रामाणिक असूनदेखील हे सारे बच्चू कडू यांच्यासारख्या जमिनीशी नाळ जुळलेल्या नेत्याला लागू होतेच.

# वेतन करार हा कामगारांचा हक्कच : कामगार नेते रवी घरत

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील भेंडखळ गावाच्या हद्दीत वसलेल्या यु एल ए गोदामातील जे एम बक्षी पोर्ट्स अँड लॉजिस्टिक प्रकल्पाच्या देवकृपा सर्व्हेअर मधील सुमारे १५० कामगारांना तब्बल १२८०० रुपयांची भरघोस पगारवाढ देण्याचा करार द्रोणागिरी जनरल कामगार संघटनेचे डॅशिंग कामगार नेते रवि घरत यांच्या माध्यमातून बुधवारी करण्यात आला आहे. वेतन करार हा कामगारांचा कायदेशीर हक्कच आहे आणि तो मिळवून देताना आम्हा कामगार नेते मंडळींना कंपनी ही टिकली पाहिजे आणि कामगार देखील जगाला पाहिजे या आमचे नेते माजी आमदार विवेकानंद पाटील यांनी दिलेल्या फॉर्म्युल्यानुसार आम्ही काम करीत आहोत आणि त्याला यश येत आहे हे कामगारांच्या एकीचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन कामगार नेते रवी घरत यांनी केले आहे



या वेतन करारा बाबत बोलतांना देवकृपा फ्रेट सर्व्हेअर कंपनीचे मालक मिलिंद पाटील म्हणाले की जे एन पी ए बंदर परिसरात अनेक प्रकल्पामध्ये कामगार नेते रवी घरत यांनी मागील अनेक वर्षांपासून वेतन करारांचा धडाका सुरू ठेवला आहे कामगारांच्या हितासोबतच कंपनीच्या अस्तित्वाला कोणत्याही प्रकारचा धोका पोहोचणार नाही याची दक्षता घेऊन ते कामागारांसाठी वेतन करार करीत असतात ही बाब अतिशय कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले तर हा वेतन करार म्हणजे येथील कामगारांना मिळालेली खूप मोठी दिवाळी भेट असून कामगार नेते रवी घरत यांच्या याच कामगार हिताच्या धोरणामुळेच या परिसरातील मोठ्या प्रमाणातील कामगार त्यांच्याकडे आकर्षित होत असल्याची प्रतिक्रिया युनिट अध्यक्ष प्रवीण भोईर यांनी दिली आहे. अतिशय आक्रमकतेपणे कामगारांची न्याय बाजू मांडल्यामुळे अवघ्या साडेपाच महिन्याच्या कालावधी मध्येच हा वेतन करार होऊ शकला याबाबत कामगारांनी समाधान व्यक्त करून कामगार कायद्यांचा गाढा अभ्यास आणि प्रशासनाला योग्य प्रकारे हाताळण्याची कसोटी असलेले कामगार नेते रवि घरत यांच्या मुळेच हा वेतन करार यशस्वी रित्या संपन्न झाल्याचे म्हणणे कामगारांनी मांडले आहे आणि त्या बद्दल आनंद देखील व्यक्त केला आहे.

कामगार नेते रवी घरत त्यांच्या सातत्याने कामगारांची बाजू अगदी रोखठोकपणे सहाय्यक कामगार आयुक्तांपर्यंत देखील मांडण्याच्या द्रोणागिरी जनरल कामगार संघटनेच्या बेधडक भूमिकेमुळेच या संघटनेकडे कामगारांचा गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणातील ओघ वाढताना दिसत आहे. हा वेतन करार करताना कंपनीच्या वतीने एच आर मॅनेजर श्री. जोशी , कामगार नेते रवी घरत,देवकृपा चे मालक मिलिंद पाटील , कामगार प्रतिनिधी युनिट अध्यक्ष प्रवीण भोईर यांच्यासह कामगार प्रतिनिधी निलेश पाटील,दिनेश म्हात्रे,अनिल ठाकूर,चेतन घरत,कवीश ठाकूर, केसरीनाथ पाटील,निशांत पाटील आदी उपस्थित होते तर अनिल ठाकूर यांनी यावेळी आभार मानले आहेत.या वेतन करारमुळे कामगार वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# श्री लक्ष्मीकांत वाचनालयात झाला ‘काव्य जागर’

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत शहरातील श्री लक्ष्मीकांत सार्वजनिक वाचनालयात पावसाच्या सरी मध्ये काव्य जागर संपन्न झाला. यामध्ये साहित्य प्रेमींनी खूप छान एकापेक्षा एक सरस कविता सादर केल्या. यावेळी मुंबई मधूनही काही रसिक आल्याने या कार्यक्रमाला वेगळीच गम्मत आली.

श्री लक्ष्मीकांत वाचनालयाच्या सभागृहात ’काव्य जागर’ चे आयोजन करण्यात आले होते. तरुण ते ज्येष्ठ सर्वांनी कविता सादर केल्या. यामध्ये आपल्या कवितेतून दिवाळी, निसर्ग पर्यावरण रक्षणाचाही ही संदेश दिला. ऋतुजा गवस यांनी प्रास्ताविक केले. ग्रंथपाल रामदास गायकवाड यांनी वाचनालयाची १०६ वर्षांच्या परंपरेचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संदीप भोसले यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्मिता सावंत तर आभार प्रदर्शन श्री.प्रताप गिते ह्यांनी केले. याप्रसंगी नैसर्गिक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्थेचेही पदाधिकाऱ्यांसह कविता प्रेमी उपस्थित होते.



# जुन्या रस्त्यांची रुंदी वाढवून इमारत आराखडयास पुर्नबांधणी परवानगी द्या : ॲड.मनोज भुजबळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नविन पनवेल हे पनवेल रेल्वे स्टेशनला लागूनच वसलेले असल्याने आणि आजूबाजूच्या ग्रामीण भागात नव्याने मोठ मोठे गृहसंकुल उभे राहिल्याने व भविष्यात नैना अंतर्गत सुध्दा प्रचंड मोठ्या प्रमाणावर गृहसंकुल व व्यापारी संकुल, शाळा, कॉलेज, त्याचप्रमाणे वेग-वेगळी सरकारी कार्यालय उभी राहणार आहेत. नविन पनवेल मधील रस्ते हे सिडकने कोणतेही भविष्यातील रहदारी, पार्किंगचा विचार न करताच अरुंद स्वरुपाचे ठेवलेले आहेत. त्यातच आजूबाजूच्या ग्रामीण भागातील उभारलेल्या संकुलांतील रहिवाशी हे हया अरुंद रस्त्यावरच आपली दुचाकी वाहणे व चारचाकी वाहणे उभी करुन रेल्वेने प्रवास करतात, अर्थात यामुळे नविन पनवेल मधील रहिवाशांना प्रचंड ट्रॅफीकचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नविन पनवेल मधील नव्याने पुर्नबांधणी होत असलेल्या इमारतींमध्ये पुरेशी पार्किंग ठेवणे, जुन्या रस्त्यांची रुंदी वाढवूनच इमारत आराखडयास पुर्नबांधणी परवानगी देण्याची मागणी मा.नगरसेवक ॲड मनोज भुजबळ यांनी आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनाही निवेदनाची प्रत देण्यात आली आहे.



या निवेदनात त्यांनी म्हंटले आहे की, नविन पनवेल मधील सिकेटी शाळे समोरील रस्त्यामधील गटार / फूटपाथ याची रुंदी कमी करुन रस्त्याची रुंदी वाढविणे, सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूने पार्किंग कमीत कमी २-२ मीटर रस्त्यांची रुंदी दोन्ही बाजूने वाढवून त्याचा वाढीव एफ.एस.आय. सदर विकसित होणाऱ्या बिल्डींग / सोसायट्यां द्यावा व रस्ता रुंद करावा, तसेच नविन पनवेल मधील सर्व अंतर्गत छोटया रस्त्यांची रुंदी रस्त्यांच्या दोन्ही बाजूने १-१ मीटर रस्त्यांची रुंदी वाढवून त्याचा वाढीव एफ. एस.आय. त्या बांधील इमारतींना दयावा. जेणेकरुन रहिवासीयांचे नुकसान होणार नाही, ह्या पुनर्विकसित होणाऱ्या इमारतीमध्ये दुपटीने रहिवासी / वाणिज्य गाळेधारक रहावयास अथवा / व्यापारी म्हणून येणार आहेत.

त्यामुळे मुळतः सदर इमारतीमधील लोकांना पुरेशी पार्किंग मिळणार आहे का? याची खात्री करुन प्रत्येक इमारतीला स्वतःची पुर्ण वाणिज्य व सदनिका यांना पार्किंगची सोय झालीच पाहिजे अन्यथा पुन्हा पार्किंगचा प्रश्न ऐरणीवर येवून स्टेशन रोड अथवा आजूबाजूच्या रहिवासियांना राहणे / जगणे मुश्किल होईल, बरेच बिल्डर हे ओ.सी. मिळविण्यासाठी २ ते ३ महिन्यासाठी भाडयाने पार्किंगची (मेकॅनिकल पार्किंग) सोय करुन नंतर ओ.सी. मिळाल्यावर ती पार्किंग काढून टाकतात व पनवेल महानगरपालिका किंवा सिडको यांची फसवणूक करतात.

याबाबत पनवेल महानगरपालिकेने दक्ष रहावे असे अधोरेखित केले आहे. तसेच या विषयाबाबत त्वरित कार्यवाही करुन नविन पनवेल पूर्व व पश्चिम येथील रहिवासियांना लवकरात लवकर न्याय द्यावा व त्या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर तसेच सभागृह नेते परेशशेठ ठाकूर यांच्यासह त्वरीत बैठक घेवून मार्ग काढावा अन्यथा आम्हाला नागरीक म्हणून वेगळे आंदोलन छेडावे लागेल असा इशारा दिला आहे.

### उरणमधील मच्छीमारांना मोंथा चक्रीवादळाचा फटका

# नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार : आ.महेश बालदी



**दै.रायगड नगरी । उरण**

अरबी समुद्रात आलेल्या मोंथा चक्रीवादळाचा उरण तालुक्यातील मच्छीमारांनाही मोठया प्रमाणात फटका बसला आहे. सुदैवाने बोटीवरील सर्व खलाशी सुखरूप परतले - असले तरी मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार महेश बालदी यांनी - करंजा बंदरावर कोळी बांधवांशी संवाद साधत - या नैसर्गिक संकटात तुमच्या पाठिशी असल्याचे - सांगत धीर दिला तसेच नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी राज्य शासनाकडे प्रयत्न करणार असल्याची ग्वाही दिली.

मोंथा चक्रीवादळामुळे उरण तालुक्यातील सात मच्छीमारी बोटींचा संपर्क तुटल्याने चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते, परंतु बुधवारी या सर्व बोटी व त्यावरील खलाशांशी संपर्क झाला असून सगळे सुखरूप असल्याची माहिती आमदार महेश बालदी यांनी दिली. ते पुढे म्हणाले की, चक्रीवादळामुळे खोल समुद्रातून वाट काढत काही बोटी परत आल्या. यात मच्छीमारांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. एक बोट समुद्रात मच्छीमारीसाठी गेल्यावर जर नैसर्गिक आपत्तीमुळे परत यावे लागले, तर दोन ते तीन लाख रुपयांचे नुकसान होते. या वेळीही मच्छीमार बांधवांना त्याच प्रकारच्या मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागला आहे.

राज्य सरकारने नुकताच मच्छीमारांसाठी मोठा निर्णय घेत मत्स्यव्यवसायाला कृषी क्षेत्राचा दर्जा दिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांप्रमाणेच मच्छीमारांनाही नैसर्गिक संकटात नुकसानभरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आता या धोरणामुळे कोळी बांधवांचे नुकसान भरून निघणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मत्स्यव्यवसायमंत्री नितेश राणे यांच्याकडे या संदर्भात झालेल्या नुकसानीचा अहवाल देऊन तत्काळ नुकसानभरपाई मिळावी, अशी ठोस मागणी करणार आहे.

अस्मानी संकटाच्या काळात कोळी बांधवांना आधार देणारे सरकार राज्यात देवाभाऊंच्या नेतृत्वाखाली काम करीत आहे. आम्ही त्या अनुषंगाने शासनाकडे पाठपुरावा करू, असेही आमदार महेश बालदी यांनी सांगितले.या वेळी मच्छीमार सोसायटीचे चेअरमन प्रदीप नाखवा, राजेश नाखवा, भारत नाखवा, रमेश नाखवा, जयविन कोळी, नारायण नाखवा, उमेश भगत, महेंद्र कोळी, ऋषिराज कोळी, राजेंद्र नाखवा, मच्छिमार व्यावसायिक, ग्रामस्थ उपस्थित होते.

# माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ताने मुख्यालयात अभिवादन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी व लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेण्यात आली.

यावेळी अतिरीक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक् कैलास गावडे, उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त अभिषेक पराडकर, उपायुक्त नानासाहेब कामठे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, उपलेखापाल संदिप खुरपे, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, जनसंपर्क अधिकारी नितीन साके तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

### स्वस्त किराणा व घरगुती सामान पुरविण्याचे अमिष दाखवून....

# विविध ठिकाणी फसवणूक करणाऱ्या पती पत्नीस पनवेल तालुका पोलिसांनी केली अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वस्त किराणा व घरगुती सामान पुरविण्याचे अमिष दाखवून विविध ठिकाणी फसवणूक करणा-या पती पत्नीस पनवेल तालुका पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्या अटकेमुळे अनेक फसवणुकीचे गुन्हे उघडकीस येणार आहेत.

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील वेगवेगळ्या सोसायटीत भाडयाने घर घेवून राहणारे आरोपी पती पत्नी नवीन धनाजी पांचाळ (वय ५२) व विद्या नवीन पांचाळ (वय ४५) यांनी तालुक्यातील हेदुटणे व पाले बुद्रुक येथील काही लोकांना स्वस्त दरात होलसेल किराणा सामान, कपडे व घरगुती वस्तू देण्याचे आमिष दाखवून प्रथम त्यांना काही सामान स्वस्तात पुरवून त्यांची फसवणूक करण्याचा हेतूने त्यांचा विश्वास संपादन करुन तसेच त्यांना किराणा व घरगुती सामानाचा स्वतःचा व्यवसाय सुरु करण्याचे आमिष दाखवून त्यांचेकडून सामानासाठी मोठी रक्कम ऑनलाईन व रोखीने एकूण ५,०५,२८५/- रक्कम स्विकारुन किराणा सामान न पुरवता तसेच घेतलेले पैसे देखील परत न देता मोबाईल फोन बंद करुन व घर सोडून निघून गेले व त्यांनी तेथील रहिवाश्यांचा विश्वासघात करुन फसवणूक करुन पळून गेले होते.

याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करताच पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, पोलीस सह आयुक्त संजय येनपुरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, पनवेल प्रशांत मोहिते, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) आनंदा कांबळे, गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे सहा. पोलीस निरीक्षक अनुरुध्द गिजे, पोलीस उप निरीक्षक हर्षल राजपुत, पोहवा विजय देवरे, पोहवा महेश धुमाळ, पोहवा सुनिल कुदळे, पोहवा सतिष तांडेल, पोहवा शिवाजी बाबर, पोहवा भुषण म्हारसे, पोशि आकाश भगत, पोशि भिमराव खताळ आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराद्वारे आरोपीना आळंदी, पुणे येथून अटक केली.

या आरोपींची वेगवेगळे मोबाईल क्रमांक, ई मेल आयडी, वेगवेगळे बँक खाते वापरुन तसेच वेगवेगळया पत्त्यांवर भाडयाने घर घेवून नमुद गुन्हयातील अनेकांची फसवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या आरोपींविरोधात वाठोडे पोलीस ठाणे, नागपूर शहर आणि कल्याण तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल असून वाठोडे पो. ठाणे, नागपूर येथील गुन्हयात दोन्ही आरोपीत फरार आहेत. यांच्या अटकेमुळे अजूनही अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.



# पेण पोलीस स्टेशन मार्फत एकता दौडचे आयोजन



**दै.रायगड नगरी । पेण**

भारताचे पहिले उपपंतप्रधान तथा गृह मंत्री पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दिडशेव्या जयंती निमित्त पुर्ण देशात राष्ट्रीय एकता दिवस साजरा केला जात असून, त्यानिमित्त पुर्ण देशात गृह खात्यामार्फत एकता दौडचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच भाग म्हणून पेण पोलीस स्टेशनमार्फत एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. हि दौड प्राप्त्त कार्यालय पेण येथून सुरू होउन धरमतर रोड मार्गे कोतवाल चौकात, कोतवाल चौकातून नरदास चाळ, पंकापाटील चौक, कयंडाळ तळा, महाविर मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे खासदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते महाराजांच्या अर्ध पुतळ्याला पुष्पहार घालुन पुढे, भारतरत्न डॉ. बाबा साहेब आंबेडकर चौकात दौड गेली.

या चौकात डॉ. बाबा साहेबांच्या देखील अर्ध पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्या नंतर महात्मा गांधी वाचनालयाच्या पटांगणावर या दौडचे रुपांतर छोटयाखाली सभेत झाले. यावेळी निवासी तहसिलदार प्रसाद कालेकर, यांनी प्रास्ताविक केले.

भाजपचे महामंत्री वैकुंठ पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर खासदार धैर्यशील पाटील यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करून राष्ट्र ीय एकता दिनाचे महत्त्व सांगितले. व यावेळी पोलीस निरिक्षक संदीप बागुल यांनी एकता दौडमध्ये शामिल झालेल्यांचे आभार मानले.

या एकता दौडमध्ये खासदार धैर्यशील पाटील, डी.वाय. एस.पी जालींदर नारकुंद, निवासी तहसिलदार प्रसाद कालेकर, जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे तथा हरीओम, महामंत्री वैकुंठ पाटील, गटनेते अनिरुध्द पाटील, ॲड. मंगेश नेने, नगरसेविका सुनिता जोशी, नगरसेवक शोमेर पेणकर, नगरसेवक संतोष मंदा लक्ष्मण पाटील, मा. नगरसेवक जनार्दन जाधव, परशूराम पाटील, दिनेशशेठ पाटील, स्वप्निल म्हात्रे, प्रफुल्ल म्हात्रे, विवेक म्हात्रे, अमित पाटील, संदेश ठाकूर यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी व शांतता कमिटी सदस्य, दक्षता कमिती सदस्य, पोलीस पाटील, हेल्थ फिटनेक ग्रुपचे सदस्य, विद्यार्थी आणि पत्रकार शामिल झाले होते. शेवटी राष्ट्रगीताने या एकता दौडची सांगता करण्यात आली.

# सर्कस'चा फलक इंग्रजी भाषेत; कार्यवाही करण्याचे सहाय्यक कामगार आयुक्तांचे आश्वासन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर सेक्टर-१४ मध्ये सुरु असलेल्या गोल्डन सर्कस या आस्थापनाने मराठी देवनागरी भाषेत फलक न लावल्याची तक्रार 'महाराष्ट्र नवनिर्माण सेना'चे पदाधिकारी गणेश बनकर यांनी पनवेल येथील कामगार उपआयुक्त यांच्याकडे केली आहे. या संदर्भात त्वरित योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन रायगड जिल्हा सहाय्यक कामगार आयुक्त मनीषा काटकर यांनी मनसे पदाधिकारी गणेश बनकर यांना पत्राद्वारे दिले आहे.

आस्थापना धारकांनी आपल्या दुकानासमोर फलक मराठी भाषेत लावावे, असा राज्य शासनाचा शासकीय अधिनियम असूनही खारघर सेक्टर-१४ मध्ये नुकतीच 'गोल्डन सर्कस' नांवाने सर्कस सुरु झाली आहे. सर्कस चालकाने 'गोल्डन सर्कस' नाव इंग्रजी भाषेत लिहिल्यामुळे मनसे पदाधिकारी गणेश बनकर यांनी सर्कस चालकाकडे मराठी भाषेत 'गोल्डन सर्कस'चा फलक लावण्याची मागणी केली. मात्र, सर्कस चालकाने त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे गणेश बनकर यांनी पनवेल येथील कामगार उपायुक्त यांच्याकडे लेखी तक्रार केली होती. सदर तक्रारीची दखल घेवून रायगड सहायक कामगार आयुक्त मनीषा काटकर यांनी कार्यालयाकडून 'गोल्डन सर्कस'च्या फलकाबाबत योग्य ती कार्यवाही त्वरित केली जाईल, अशा आश्वासनाचे पत्र गणेश बनकर यांना दिले आहे.

# तळोजात महिलांच्या आत्महत्येच्या दोन घटना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील तळोजा परिसरात सलग दोन महिलांच्या आत्महत्येच्या घटना घडल्या आहेत .

पहिल्या घटनेत हॉटेल मॅनेजमेंट शिकणाऱ्या १९ वर्षीय तरुणीने इमारतीच्या दहाव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. तर दुसऱ्या घटनेत नावडे गावात हुंडाबळीमुळे एका विवाहितेने गळफास घेऊन जीवन संपवले. या दोन्ही घटनांमुळे तळोजा व नावडे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.तळोजा उपनगरातील एका उंच इमारतीत घडली. तरुणीने इमारतीच्या आपत्तीवेळेसाठी राखीव असलेल्या दहाव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली.

दुसरी घटना तळोजातील नावडे गावात घडली. एका विवाहितेने सासरच्या शारीरिक आणि मानसिक छळाला कंटाळून राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी सहा जणांवर हुंडाबळीचा गुन्हा दाखल केला असून पती, सासू-सासरे यांना अटक केली आहे.

# वडिलांना मारहाण प्रकरणातील आरोपीला अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वडिलांना लोखंडी सळईने मारहाण करून जखमी करणाऱ्या आरोपी बाळाराम चौधरी (५०, राहणार चिखले) याला पनवेल तालुका पोलिसांनी २७ ऑक्टोबर रोजी अटक केली.

२२ सप्टेंबर रोजी चिखले येथील गणा चौधरी यांना त्यांचा मुलगा बाळाराम चौधरी याने लोखंडी सळईने दोन्ही पायावर मारहाण केली होती. यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल करण्यात आले होते. त्यानंतर पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तिघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील गणा चौधरी यांचा मुलगा बाळाराम चौधरी याला पनवेल तालुका पोलिसांनी अटक केली.

**महेश शितोळे, तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी महाड यांचे न्यायालयात**

**क्रि.चौ.अर्ज नं.२६९/२०२५**

१) श्रीम.मुमताज आदम कबले
रा.मु.पो.कुसगांव, ता.महाड, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
१) ग्रामसेवक
ग्रामपंचायत कुसगांव, ता.महाड, जि.रायगड — सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार हे मुळचे कुसगांव ता.महाड, जि.रायगड येथील रहिवासी आहेत. अर्जदार यांचा जन्म दि.०७/०४/१९६५ रोजी मौजे : कुसगांव, ता.महाड येथे झालेला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कुसगांव, ता.महाड यांचे रजिस्टरला झालेली नाही. त्याकामी त्यांनी सदरची जन्म नोंद घालणेकामी या न्यायालयाकडे अर्ज केलेला आहे. त्याकामी सदर नोंदीस कोणाचीही काहीही हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत स्वतः अगर आपले अखत्यारी वकीलामार्फत न्यायालयात हजर राहून लेखी हरकत कळवावी. तशी हरकत मुदतीत न आल्यास त्याचा कोणताही विचार न करता अर्जदार यांस सदरचा जन्म नोंद करण्याबाबतचा आदेश दिला जाईल त्याची नोंद घ्यावी.

ठिकाण : महाड
दि.२७/१०/२०२५

सही/-
**तहसीलदार महाड**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत महादेव अनंत पाटील व सुमन भास्कर गायकवाड यांच्या मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे बांधपाडा येथील मिळकत भूमापन/सर्व्हे नं. २०/२ यांसी एकूण क्षेत्र ००.०७.९० हे. आर. प्र., पोटखराबा ०.००.२० हे. आर. प्र., यांसी आकार रक्कम रुपये ०.३७ पैसे, यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख : १ नोव्हेंबर २०२५

सही/-
**श्री.विनायक र.ताम्हणकर, वकिल**
**३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३.**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२.**

## जाहीर नोटीस

सर्वांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, निम्ननिर्दीष्ट मालमत्ता जमिन मालकांनी त्यांचे मालकीवहिवाटीची व निर्वेध आहे असा निर्वाळा दिला मिळकतीचे सर्व हक्क अधिकारासुध्दा मिळकत कायम खरेदी देणेबाबत त्यांची आमचे अशिलांजवळ बोलणी चालू आहेत. तरी व्यवहारास कायदेशीर बाधा राहू नये व टायटल तपासणीचा भाग म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी सदर मिळकतीं संदर्भात अन्य कोणास गहाण, दान, बक्षीस, लीन, लीज, अन्नवस्त्र, पोटगी, अदलाबदल, हवा, उजेड, जाणेयेणेचा मार्ग, इजमेंट, वहिवाट, मृत्यूपत्र इ. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार असलेस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांत प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी कळवावे. अन्यथा सदर नोटीस मुदत अखेर कथित हक्क अधिकार जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारे हरकतींचा विचार केला जाणार नाही.

वरीलप्रमाणे नोटीस प्रसिध्द करणेस येत आहे.

**अ) मिळकतीचे वर्णन मौजे वाली, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत, तिचे वर्णन खालीलप्रमाणे :-**

| गट नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ७४ | ०-२३-०० | १.१२ | नीरज स्वरुपानंद कोठारी |

माणगाव
दि.३१/१०/२०२५

सही/-
**ॲड.राहुल प्र. ओक**
**'मानस', मुंबई - गोवा हायवे**
**पो. ता. माणगांव, जि. रायगड.**
**मो.नं. ८८८८३७३००५**
**(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)**

## जाहीर नोटीस

तरी मा या जाहिर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल अ) मे. व्हायब्रंट व्हेंचर तर्फे भागिदार १) श्री. विनोद शंकरलाल भानुशाली २) श्री. हरेश मोहनभाई पटेल ३) श्री. राहुल सुरेशभाई पटेल ४) श्री. अशेष जेटालाल पटेल पत्ता बी-५०१, श्री बालाजी कृपा सोसायटी, प्लॉट नं. ११ए, सेक्टर २०, खारघर, नवी मुंबई ४१०२१०, ब) मे. ऑरा लाईफस्पेस तर्फे भागिदार १) श्री. वेलजी विशा मेनात २) श्री. जुनैद अब्दुल माजिद फर्निचरवाला ३) श्री. किर्ती मुरजी रंभिया ४) श्री. संजय अमरनाथ अवस्थी ५) श्री. यतीन अजय कदम पत्ता : ९१६, एन.एम.एस. आयकॉन, प्लॉट नं. १९४, सेक्टर १९, उलवे, नवी मुंबई - ४१० २०६, यांनी मूळ मालक १) श्री. गिरिश जगदिश कासट २) सी. नीतु गिरिश कासट राहणार : कापड बाझार, पनवेल, नवी मुंबई ४१० २१६ यांच्या मालकीची मिळकत २२.५ टक्के योजनेअंतर्गत संपादित केलेली असुन सदरहू संपादनापोटी सिडको २२.५ टक्के योजनेअंतर्गत खालील वर्णनाचा भुखंड मिळालेला असुन सदरहू भुखंड आमचे अशिल यांनी कायमस्वरुपी सिडको त्रिपक्षीय करारान्वये हस्तांतरित करुन घेण्याचे ठरविलेले आहे. सदरहु भुखंडाचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**नोड पुष्पक (वहाळ), ता. पनवेल, जि. रायगड**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक (वहाळ) | २७ | २० | १११० चौ.मी. |

तरी वरिल वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, चोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात आम्हांला आमचे खालील पत्यावर समक्ष येऊन भेटून त्याबाचत मुळ कागदपत्रानिशी नमदू केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून व्यवहार पूर्ण करतील व त्या नंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,
दि.३१/१०/२०२५

सही/-
**ॲड.रेखा कि. होवाळे**
**शॉप नं. १३, प्रभात सेंटर, सेक्टर १ए, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४**

## जाहीर नोटीस

महसूल व वन विभाग
अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव यांचे कार्यालय कचेरी रोड, माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड
Email ID: altmangaon@gmail.com

जाहीर सुनावणी नोटीस — दावा क्रमांकः ८२/२०२५

प्रति,
१. श्री. रमेश बाळाजी वाघरे
रा. बोरघर तर्फे खरवली ता. माणगांव जि. रायगड — वादी
विरुध्द
१. श्रीम. सुषमा श्रीपाद दातार २. श्रीम. मृणाल भालचंद्र सप्रे
३. श्री. श्रीपाद विठ्ठल भट ४. श्री. मुकुंद विनायक भट
५. श्रीम. लक्ष्मीबाई अनंत भट ६. श्रीम. अंजली अनंत भोगले
७. श्रीम. सुनिती सदाशिव भट
८. श्रीम. हर्षल सदाशिव भट ९. श्री. चैतन्य सदाशिव भट
१०. श्रीम. अक्षता अनंत जाईलकर
११. श्रीम. राधिका कृष्णा घुलघले
१२. श्रीम. पार्वती पांडुरंग वाघरे
१३. श्री. मनोहर पांडुरंग वाघरे
१४. श्रीम. लक्ष्मी सिताराम तलार
१५. श्रीम. सविता संतोष इंदुलकर
१६. श्रीम. लक्ष्मी सिताराम तलार १७. श्री. प्रभाकर शंकर वाघरे
१८. श्रीम. मिनाक्षी हरिश्चंद्र शिगवण
१९. श्रीम. रेश्मा रमेश कळंबे २० श्रीम. शेवती शंकर वाघरे
२१. श्रीम. द्रोपदी बाळाजी वाघरे
२२. श्रीम. सुलोचना युवराज ढवळ
सर्व रा. बोरघर तर्फे खरवली ता. माणगांव जि. रायगड. — प्रतिवादी

ज्याअर्थी, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळ कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनुसुचीमध्ये नमुद केलेल्या आणि कुळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. आणि त्यासाठी जमिनीची खरेदी किंमत ठरवून मिळण्यासाठी न्यायधिकरणाकडे दावा अर्ज दाखल केलेला आहे. आणि ज्याअर्थी न्यायाधिकरणाने कुळकायद्याच्या तरतुदीनुसार जमिनीची किंमत निर्धारित करण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी सदर दाव्याची सुनावणी दिनांक ०७/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आली आहे. तरी सदर तारखेस अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव, जि. रायगड येथे स्वतः वकील अथवा प्रतिनिधीमार्फत न्यायाधिकरणापुढे हजर राहुन बाजू मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती, न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचून नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसुर करील, तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल. व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालवून न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

**अनुसूची**

| गावाचे नांव | स.नं. | एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बोरघर त.खरवली, ता.माणगाव | ४४७ | १-१८-०० | ०.३२ |

ठिकाण : माणगांव
दिनांक : ३१/१०/२०२५

सही/-
**(दशरथ काळे)**
**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव**

## पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | Superintending Engineer (Metro), Cidco Ltd., 7th Floor, Cidco Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai | ०१ पिंपळ, ०१ गुलमोहर, ०१ कदंब व ०१ सप्तपर्णी अशी एकूण ०४ झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील Kharghar Bus Depot, Plot No.39, Sector-14, Kharghar येथील ०४ झाडे इमारतीचे प्रवेशद्वारे व सुरक्षा भिंतीचे बांधकाम करणे तसेच बस डेपो मार्गामध्ये बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**उपायुक्त**
**तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र. PMC-PARK/458/2025-PTAD

# रायगड एसटीची कोटींची कमाई, पण प्रवाशांना अजूनही यातना ; बसस्थानकांची दयनीय अवस्था उघडकीस

**दै.रायगड नगरी । पेण**

रायगड : दिवाळीच्या दहा दिवसांत रायगड विभागातील राज्य परिवहन महामंडळाने तब्बल १३ लाख ३५ हजार किलोमीटरचा प्रवास करत जवळपास सात कोटी रुपयांचं उत्पन्न कमावलं आहे. ही आकडेवारी ऐकून वाटतं, रायगड एसटी विभाग सोनं कमावतोय. पण वास्तव मात्र पूर्ण वेगळं आहे. प्रवाशांना या उत्पन्नाचा किंचितही फायदा होत नाही, कारण रायगड जिल्ह्यातील बहुतांश बसस्थानकांची अवस्था आजही अतिशय दयनीय आहे.



महाड, माणगाव, श्रीवर्धन, पेण, अलिबाग, मुरुड, कर्जत आणि रोहा या आठ आगारांमधून प्रवासी सेवा सुरू असली तरी प्रत्येक स्थानकात एकच चित्र दिसतं – मोडकळीस आलेली इमारत, छप्पर गळणारं प्रतीक्षालय, गलिच्छ वातावरण आणि प्रवाशांच्या डोळ्यातील असहाय्यता. बसस्थानकांची दुरवस्था इतकी भीषण आहे की, दिवसभर हजारो प्रवासी इथे येत असले तरी बसण्यासाठी नीट बेंच नाही, पावसात वा उन्हात उभं राहायला छत्र नाही, आणि शौचालयांची अवस्था तर अधिकच वाईट. महिलांसाठी स्वतंत्र आणि स्वच्छ सुविधा नाहीत, वृद्धांना व अपंगांना मूलभूत सोयींचा पूर्ण अभाव आहे.

पेण बसस्थानकात प्रवाशांची गर्दी कायम असते, पण स्वच्छता आणि प्रकाशयोजना नाही. रात्रीच्या वेळेस परिसर अंधारात बुडतो, सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत, सुरक्षा रक्षकांची उपस्थितीही नसते. अलिबागसारख्या पर्यटनस्थळावरही बसस्थानकाचे दृश्य निराशाजनक आहे. महाड आणि माणगाव बसस्थानकांची अवस्था देखील फार वेगळी नाही – इथे गाड्यांचा आवाज, धूळ, कचरा आणि अस्वच्छता हे रोजचं वास्तव आहे. श्रीवर्धनसारख्या किनारी तालुक्यात बसस्थानकावर शौचालयांची दुर्गंधी असह्य झाली आहे. प्रवाशांना लांब रांगा, तिकीट खिडकीवरचा गोंधळ आणि बस वेळांची अचूक माहिती नसल्यामुळे त्रास सहन करावा लागतो.

एसटी महामंडळ दरवर्षी उत्पन्नाची आकडेवारी मोठ्या गर्वाने जाहीर करतं. पण हा पैसा नेमका कुठे खर्च होतो, हे कोणालाही ठाऊक नाही. कोटींचं उत्पन्न मिळवूनही बसस्थानकांच्या दुरुस्तीसाठी, नव्या प्रतीक्षालयांसाठी, स्वच्छ शौचालयांसाठी किंवा प्रकाशयोजनेसाठी काहीही हालचाल होत नाही. लोक दररोज करमुक्त तिकीट विकत घेतात, सरकारच्या खात्यात पैसा जमा करतात, पण बदल काहीच दिसत नाही. प्रशासनाला अभिमान आहे की प्रवाशांनी एसटीला पसंती दिली, पण ही पसंती आता जबाबदारीत रूपांतरित झाली पाहिजे.

रायगड जिल्ह्यातील एसटी बस म्हणजे आजही गरीब जनतेचा एकमेव आधार. पण या गरीबरथला मिळणारी वागणूक पाहता वाटतं, सरकारला या प्रवाशांच्या वेदनांची किंमत नाही. प्रवासी आपलं जीवन जोखमीवर ठेवून या जीर्ण बसस्थानकातून प्रवास करतात. एखादी बस उशिरा आली की त्यांच्या मनात राग नव्हे, तर निराशा निर्माण होते – कारण त्यांना माहित आहे, तक्रार केली तरी फरक पडणार नाही.

दिवाळीत मिळालेल्या जवळपास सात कोटींच्या उत्पन्नाचा काही भाग तरी प्रवाशांच्या सोयीसाठी वापरला गेला पाहिजे. हा पैसा फक्त आकडेवारीत न राहता, तो वास्तविक सुधारण्यात रूपांतरित झाला पाहिजे. एसटी महामंडळाकडून सेवा नव्हे, तर जबाबदारीची अपेक्षा आहे. प्रवाशांनी पैसा दिला, विश्वास दाखवला, आता त्या विश्वासाची परतफेड करण्याची वेळ आली आहे. रायगडकरांनी आपल्या प्रवासाला मान मिळावा, हीच अपेक्षा आहे. कोटींच्या उत्पन्नावर नाही अभिमान – प्रवाशांच्या वेदनेवर उत्तर हवं. रायगडकर आता शांत बसणार नाहीत!

## महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांना लोकसेवा हक्क अधिनियम व ई ऑफिस प्रशिक्षण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी लोकसेवा हक्क अधिनियमाचे प्रशिक्षण आज दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी आद्य वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.



यावेळी उपायुक्त स्वरूप खारगे यांनी महाराष्ट्र लोकसेवा अधिनियम २०१४ अंतर्गत नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध सेवा व सुविधा याबाबत अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती दिली. तसेच नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांबाबत दक्ष व तत्पर रहावे अशा सूचना दिल्या.

नागरिकांच्या समस्या व तक्रारीबाबत महापालिकेने सुरू केलेल्या तक्रार निवारण प्रणाली (ग्रीव्हीअन्स पोर्टल) वरती तसेच महापालिकेच्या कॉल सेंटरवतरी येणाऱ्या तक्रारींचा तात्काळ निपटारा करण्याबाबत उपायुक्तांनी मार्गदर्शन केले.

राज्य शासनाच्या विविध धोरणांची परिणामकारक अमंलबजावणी करण्याच्या दृष्टीने व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी अद्ययावत ठेवण्यासाठी १५० दिवसांचा कार्यक्रम शासनामार्फत राबविण्यात येत आहेत. यासाठी हे प्रशिक्षण महत्व-पूर्ण होते. या प्रशिक्षणास महापालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यालयीन कामकाज वेगवान व्हावे, कामात पारदर्शकता यासाठी महापालिकेने ई ऑफिस प्रणालीचा प्रभावी वापर महापालिकेमध्ये केला जात आहे. यामध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या वतीने अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. याचबरोबर कर्मचाऱ्यांच्या एचआरएमएस डॅशबोर्ड, हजेरी डॅशबोर्ड याविषयीची ही माहिती परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी उपस्थितांना दिली.

## पनवेल तालुका पोलिसांतर्फे वॉकेथॉनचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पोलिसांतर्फे एकता दौड, एक धाव, एक भारत, एकता आमची ताकद या हे ब्रीदवाक्य घेऊन वॉकेथॉनचे आयोजन नेरे पोलीस चौकी ते नेरपाडा, कोप्रोली यादरम्यान करण्यात आले होते.

पनवेल तालुका पोलिसांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकता दौड, वॉकयाथॉनमध्ये आजूबाजूच्या परिसरातील नागरिक, विद्यार्थी, स्वयंसेवक, पोलीस पाटील, पत्रकार सहभागी झाले होते.

नेरे पोलीस चौकी नेरे गाव ते कोप्रोली पर्यंत वॉकयाथॉनचे आयोजन करण्यात आले. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, पोलीस निरीक्षक आनंद कांबळे यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस कर्मचारी, पोलीस पाटील, शिक्षिका, विद्यार्थी यात सहभागी झाले होते.



## रायगडच्या जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे निलंबित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे यांना अखेर निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्या कार्यपद्धतीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीवरून त्यांची प्राथमिक चौकशी करण्यात आली. सादर करण्यात आलेल्या अहवालातील निरीक्षणांच्या आधारे त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई आली आहे.

महाराष्ट्र शासनाचे कार्यासन अधिकारी प्रे. ज्ञा. सोनटक्के यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नुसार तत्काळ निलंबनाचे आदेश पारित केले आहेत. पुढील आदेश मिळेपर्यंत डॉ. विखे निलंबित असणार आहेत. निलंबन आदेश अमलात असेपर्यंत डॉ. विखे यांचे मुख्यालय उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे येथे निश्चित करण्यात आले आहे. त्यांना सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. निलंबनाच्या काळात त्या खाजगी नोकरी, व्यापार किंवा उद्योगधंदा करू शकणार नाहीत. असे केल्यास ते गैरवर्तन मानले जाईल आणि त्या निर्वाहभत्ता मिळण्यास अपात्र ठरतील. निलंबन कालावधीत त्यांना निर्वाहभत्ता व इतर पूरक भत्ते देण्यात येतील, असे आदेशात स्पष्ट केले आहे.

डॉ. मनिषा विखे या रायगड जिल्हा परीषदेत जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. त्यांची ठाणे येथे जिल्हा क्षयरोग अधिकारी म्हणून बदली झाली. त्यांच्या जागी डॉ. दयानंद सुर्यवंशी यांची नियुक्ती करण्यात आली. याविरोधात त्यांनी मॅटमध्ये धाव घेतली. डॉ. मनिषा विखे यांना पुन्हा रायगड जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून रूजू करून घ्यावे असा निर्णय मॅटने दिला. दरम्यानच्या काळात डॉ. विखे यांच्या विरोधात आरोग्य कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी यांच्या तक्रारी होत्या. आरोग्य कर्मचारी तसेच अधिकाऱ्यांच्या संघटनांनीदेखील त्यांच्याविरोधात तक्रारी केल्या होत्या. त्यावर डॉ. विखे यांची खातेनिहाय चौकशी सुरू होती.



## लवकरच ‘अटल करंडक एकांकिका’ स्पर्धेच्या १२ व्या पर्वाचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या 'राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका' स्पर्धेचे यंदा १२ वे वर्ष असून त्या अंतर्गत राज्यातील प्राथमिक केंद्रांच्या प्राथमिक फेरीला ०६ नोव्हेंबरपासून प्रारंभ होणार आहे.

नाट्य चळवळ वृद्धींगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आ-पले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वृद्धींगत व्हावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा हे ब्रीदवाक्य घेऊन अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. स्पर्धेचे देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्ये आहेत. या स्पर्धेत नवनवीन संकल्पना आणि दर्जेदार एकांकिका सादर होत असल्याने हा करंडक महाराष्ट्रभर सुप्रसिद्ध झाला असून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत स्पर्धेचा आवाका वाढला आहे. गेल्या ११ वर्षांत स्पर्धेने नाट्यविश्वात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. स्पर्धेचे देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, सर्वोत्तम स्पर्धास्थळ आणि दर्जेदार परीक्षणामुळे ही स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली आहे.

स्पर्धेतील अंतिम फेरीतील विजेत्या प्रथम क्रमांकास एक लाख रुपये, प्रमाणपत्र आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय ७५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक ५० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ दोन बक्षिसे प्रत्येकी १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह तसेच लक्षवेधी एकांकिकेला ३० हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्कृष्ठ विनोदी एककांकिकेला २० हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह आणि इतरही वैयक्तिक पारितोषिके देऊन कलाकारांना गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेतील सोलापूर केंद्राची प्राथमिक फेरी ०६ नोव्हेंबरला, कोल्हापूर ७ नोव्हेंबर, रत्नागिरी ८ नोव्हेंबर, नाशिक १५ नोव्हेंबर, जळगाव १६ नोव्हेंबर, पुणे २२ व २३ नोव्हेंबर, रायगड २६ व २७ नोव्हेंबर आणि मुंबई व ठाणे केद्रांची प्राथमिक फेरी २८, २९ व ३० नोव्हेंबर रोजी नियोजित केंद्रांवर होणार आहे. तर महाअंतिम फेरी ५, ६ आणि ७ डिसेंबर रोजी पनवेलमधील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे.

## पनवेल पालिकेत पुन्हा भरती प्रक्रिया; १३४ रिक्त पदांसाठी नव्याने परीक्षा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेतील १३४ रिक्त पदांसाठी लवकरच पुन्हा भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. सप्टेंबर महिन्यात शासनाकडे भरती प्रक्रियेला मुदतवाढ मिळावी, यासाठी महापालिकेने पाठविलेला प्रस्ताव तांत्रिक कारणामुळे मागे घेण्यात आला असून आता पुन्हा टीसीएस कंपनीमार्फत नव्याने भरती प्रक्रिया सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

पनवेल महानगरपालिकेमध्ये १३४ पदे रिक्त असल्याने प्रशासनाने या पदांसाठी नव्याने भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या पनवेल महापालिकेत एकूण १३२६ कर्मचारी कार्यरत आहेत.

यापैकी ८२५ जण महापालिका आस्थापनातील अधिकारी आणि कर्मचारी असून ६७ जण हे शिक्षक आहेत. २०२३ साली टीसीएस कंपनीमार्फत ३७७पदांची भरती प्रक्रिया पूर्ण झाली होती. मात्र काही उमेदवारांनी इतर संस्थांमध्ये रुजू झाल्याने १३४ पदे पुन्हा रिक्त राहिली. सप्टेंबर महिन्यात महापालिकेने शासनाकडे या भरती प्रक्रियेला मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव पाठविला होता. मात्र, तांत्रिक कारणामुळे तो प्रस्ताव अमान्य ठरण्याची शक्यता निर्माण झाल्याने महापालिकेने तो प्रस्ताव मागे घेतला आहे. परिणामी प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना संधी मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले असून, आता या पदांसाठी पुन्हा परीक्षा घेऊन भरती प्रक्रिया पार पडणार आहे.

महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी सामान्य प्रशासन विभागाला निर्देश दिले असून, नव्याने प्रक्रिया राबविण्यासाठी टीसीएस कंपनीकडून लागणाऱ्या खर्चाचा सविस्तर तपशील मागविण्यात आला आहे. या हालचालीमुळे महापालिकेतील सुमारे १३४ पदांच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे.

या पार्श्वभूमीवर नव्या भरती प्रक्रियेच्या तयारीला वेग आला असून, लवकरच पनवेल महापालिकेकडून जाहिरात प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. यामुळे स्थानिक तरुणांसाठी पुन्हा एकदा रोजगाराची नवी संधी उपलब्ध होणार आहे.या रिक्त पदांपैकी सर्वाधिक म्हणजे ७६ पदे ही लिपिक-टंकलेखक या संवर्गातील आहेत. त्याशिवाय कनिष्ठ अभियंता (स्थापत्य, विद्युत, हार्डवेअर-नेटवर्किंग), वैद्यकीय अधिकारी, हिवताप अधिकारी, परिचारिका, अग्निशमन दलातील कर्मचारी, वाहनचालक, माळी, सहाय्यक क्रीडा अधिकारी, तसेच विविध लघुलेखक पदेही रिक्त आहेत.

> पनवेल महापालिकेने ३७७ पदांसाठी सरळ सेवेमार्फत परीक्षा घेतली त्या काळात राज्य सरकारच्या विविध परीक्षा सुरू होत्या, अनेक उमेदवारानी इतर विभागांच्या भरती प्रक्रियेतही सहभाग घेतल्याने काहींची निवड एकापेक्षा अधिक ठिकाणी झाली, त्यापैकी अनेकांनी आपल्या राहत्या परिसराच्या जवळील नोकरीला प्राधान्य दिल्यामुळे पनवेल महापालिकेतील निवड झाल्यानंतर त्यांनी रुजू होणे टाळले. त्यामुळे आयुक्तांच्या निर्देशानुसार आता रिक्त पदासाठी पुनश्च भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
>
> **– कैलास गावडे, उपायुक्त, पनवेल महापालिका**
>
> **सर्वाधिक लिपिक-टंकलेखक पदे**

## महाड जवळ कोकण रेल्वे जंक्शन साठी संभाजी ब्रिगेडचा पाठिंबा

**दै.रायगड नगरी । माण-गाव**

महाड शहराजवळ कोकण रेल्वे जंक्शन व्हावे यासाठी महाड शहरामधील रहिवाशी पराग वोडके हे गेल्या २ दिवसांपासून छत्रपती शिवाजी महाराज चौक, महाड या ठिकाणी आमरण उपोषण करत आहेत. सुरू झालेल्या या उपोषणाकडे प्रशासनामार्फत अजूनही कोणताही सकारात्मकपणे तोडगा काढण्यात आलेला नाही.

महाड तसेच पोलादपूर रहिवाशांसाठी महत्व-ाचा विषय असलेल्या या रेल्वे जंक्शन तथा रेल्वे स्थानकासाठी आपला जाहीर पाठिंबा देण्यासाठी संभाजी ब्रिगेडचे रायगड जिल्हाध्यक्ष-शिवश्री वैभव हरिश्चंद्र सुर्वे,महाड तालुकाध्यक्ष-शिवश्री कैलास अटक,महाड तालुका उपाध्यक्ष-शिवश्री सुजित सुतार,महाड तालुका सचिन- शिवश्री निकेश पवार उपस्थित होते, यावेळी रायगड जिल्हाध्यक्ष शिवश्री वैभव सुर्वे यांनी महाड जवळ कोकण रेल्वेचे जंक्शन होण्यासाठी संभाजी ब्रिगेड रायगड तर्फे जाहीर पाठिंबा दिला आहे.